***शिक्षणाचे सर्व क्षेत्रातील बाजारीकरण रद्द करण्यासाठी केजी ते पीजी मोफत,समान, गुणवत्तापूर्ण शिक्षण व्यवस्था सार्वजनिक निधीद्वारे प्रत्यक्षात आणण्यासाठी***

# मुंबई शिक्षण कंपनीकरण विरोधी अभियान

अवेहि-ॲबकस प्रकल्प, के.के.मार्ग म्यु. शाळा, न्यू. शिरीन टॉकीजच्या मागे, सात रस्ता, जेकब सर्कल, महालक्ष्मी, मुंबई ४०००११ फोन नं.: २३०७५२३१ email: avehiabacus@gmail.com
युसूफ मेहेरअली सेंटर, डी-१५, गणेश प्रसाद, नउशिर भरूचा मार्ग, ग्रँटरोड (प.),मुंबई - ४००००७ फोन नं. : २३८७००९७ email: yusufmeherally@gmail.com

जावक क्र. : मुंशिकंविअ/०४/२०१३ दिनांक: .३.२०१३

## महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्याना मुंबईच्या जनतेचे आवाहन
## मुंबई महानगरपालिकेला मुंबईच्या शाळा खाजगी कंपन्या, एनजीओ, खाजगी संस्थांच्या ताब्यात देण्याचा अधिकार नाही !
## सर्वांना समान शिक्षण, तरच लोकशाहीचं रक्षण !

मा. नामदार मुख्यमंत्री
महाराष्ट्र राज्य, मंत्रालय,
मुंबई ४०००३२
यांस स.न.

महोदय,

मुंबईतील मनपाच्या सर्व ११७४ शाळा खाजगी कंपन्यांना, खाजगी संस्थांना 'पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिपच्या' नावाखाली ताब्यात देण्याचा अतिशय घातक निर्णय मनपाने २३ जानेवारी २०१३ रोजी घेतला आहे, त्यांचा आम्ही निषेध करतो.

सर्वांसाठी समान, उच्च दर्जाच्या सरकारी शाळा उभारणीची राज्यघटनाबद्ध पद्धती स्विकारण्या ऐवजी श्रीमंत घरातील मुलांसाठी खाजगी, महागड्या शाळा उभ्या करायला परवानगी द्यायची आणि सर्वसामान्यांच्या मुलांना परवडणाऱ्या मनपा /सरकारी शाळांचा दर्जा जाणीवपूर्वक घसरवून त्या बदनाम करायच्या; असा क्रम कित्येक वर्षे सुरू आहे. मनपा शाळांमध्ये पुरेसे कायम स्वरूपी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी दिले जात नाहीत. अनेक शाळा फक्त दोन शिक्षकांवर चालवल्या जातात. अश्या शाळांमध्ये शिकणे शिकवणे होतच नाही. मनपाच्या अनेक शाळांमध्ये एकेका वर्गात साठ-सत्तर विद्यार्थ्यांना फरशीवर बसवले जाते, बेंचेस नाहीत, पिण्यासाठी पाणी नाही, संडास-मुताऱ्यांमध्ये पाणी नाही, विकलांग मुलांसाठी विशेष शिक्षक, मूलभूत सुविधा दिल्या जात नाहीत. शिक्षकांवर अशैक्षणिक कामाचा व निरर्थक योजनांचा प्रचंड बोजा लादला जाता, वर्गात शिकवण्याऐवजी त्यांना इतर जबाबदाऱ्या दिल्या जातात. ह्या कारणांनी एके काळी मुंबई शहराचे उज्जवल भविष्य व चांगले विद्यार्थी घडविणाऱ्या मनपा शाळा आज ऱ्हासाच्या मार्गावर ढकलल्या गेल्या आहेत.

आता त्याच्याही पुढचे पाऊल मुंबई महानगरपालिकेने टाकले आहे. दर्जा सुधारण्याच्या नावाने, मुलांचे भले करण्यासाठी 'पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप' (पीपीपी) तत्त्वा आधारे खाजगीकरणाचा निर्णय घेत मनपाच्या शाळा कंपन्याना, खाजगी संस्थांना, ताब्यात देऊन आपली संपूर्ण जबाबदारी झटकण्याचा मनपाचा हा डाव आहे. एनजीओ ,देशी /परदेशी पैशांवर चालतात. त्या जनतेशी बांधिल नसतात जो त्यांना पैसे देईल त्यांच्याशी त्या बांधलेल्या असतात. वेगवेगळ्या एनजीओ विद्यार्थ्यांवर स्वत:चे वेगळे नियम लावतात, समानतेच्या तत्वाची पायमल्ली करतात, विद्यार्थ्यांकडून सहलीसाठी, इतर उपक्रमासाठी पैसे घेतात, प्रवेश नाकारतात. एनजीओ अप्रशिक्षित शिक्षकांना भरती करून कंत्राटी पद्धतीला चालना देतात. एनजीओंच्या शाळांना अनेक नियमांमध्ये सूट देऊन, वर त्यांना जनतेच्या कष्टाचा सरकारी पैसा देऊन त्यांची भलामण करुन, जाणिवपूर्वक मनपाच्या शाळांचे खच्चीकरण केले जात आहे.

मनपा आजवर ८ भारतीय भाषांमधून शिक्षण देऊन मुंबई शहर व देशाच्या सांस्कृतीक विविधतेचा सन्मान करणारी संस्था होती. एनजीओ मात्र ईंग्रजी शिक्षणाचे आमीष दाखवून भाषा विकास, स्वतंत्र विचार करण्याची, ते मांडण्याची शक्ती हिरावून व सांस्कृतीक विविधतेला तडा देणारे केवळ लिहिण्या-वाचण्या जोगे तथाकथीत शिक्षण देऊ करत आहेत. हा भारतीय समाजाच्या प्रगति व अस्तित्वावर मूळापासून घातलेला घाव आहे. चार लाख मुलांनी काय शिकायचं, कसं शिकायचं ते आता कंपन्या व त्यांच्या फंडींगवर चालणाऱ्या एनजीओ ठरवणार आहेत. हा निर्णय म्हणजे राज्यघटनेतील मूलभूत अधिकार कलम १४,१५,१६ आणि मार्गदर्शक तत्व कलम ४१,४५ तसेच मुलांना अर्धा अधिक अधिकार देणारा 'शिक्षण हक्क कायदा २००९' यांना मनपाने दिलेले उघड आव्हानच आहे.

जनतेच्या करातून जमा झालेल्या सार्वजनिक निधीतील करोडो रुपये आणि करोडो रुपयांच्या इमारती ह्या निर्णयामुळे खाजगी कंपन्यांच्या, एनजीओंच्या, खाजगी संस्थांच्या ताब्यात जाणार आहेत. मनपाकडे शाळांसाठी आरक्षित व बिगर आरक्षित भूखंड रूपाने अब्जावधी रुपये किमतीच्या जमिनी आहेत. गिरणी धंदा मोडून वीस वर्षांपूर्वी कामगारांना देशोधडीला लावून जशा जमिनी बिल्डरांना दिल्या गेल्या तसाच प्रकार ह्या वेळी शाळांच्या जमिनींच्या संदर्भात होणार आहे.

मुंबई महानगरपालिका कायदा १९८८ मधील कलम ६१ क्यू अन्वये प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी शासनाची अर्थात पालिकेचीच आहे. कलम ४ ई द्वारे शिक्षण समिती जी संविधानिक समिती असल्याने तिला राज्यघटने विरोधी निर्णय घेण्याचा अधिकार नाही. कलम १२६ डी नुसार शिक्षण समितीस बजेट ठरविण्याचा अधिकार दिला आहे. मात्र ते बजेट कंपन्यांच्या ताब्यात देण्याचा अधिकार दिलेला नाही. कलम १९५ ई नुसार शासनाने महानगरपालिकेला शिक्षण कर (एज्युकेशन सेस) लावायला परवानगी दिली आहे. महानगरपालिका हा टॅक्स प्रत्येक नागरिकाकडून दररोज वसुल देखील करते. शासनाच्या जेव्हढ्या इमारती, कार्यालये महापालिका मुंबईच्या हद्दीत आहेत त्याचा मालमत्ता कर महापालिका घेत नाही. ह्या एकूण मालमत्ता कराच्या ८०% रक्कम राज्य शासन पालिकेस शिक्षणासाठी देते. त्या शिवाय पालिका शिक्षणावर दर वर्षी जेव्हढा पैसा खर्च करते त्याच्या तुलनेत ५०% पैसा राज्यशासन महानगरपालिकेला नियमितपणे अनुदान म्हणून देते. पालिका ही जनतेच्या पैशावर चालणारी असल्याने जनतेच्या व राज्यघटनेच्या विरोधात पालिकेला असे काहीही करण्याचा अधिकार नाही.

यास्तव आम्ही नागरीक महापालिकेच्या ह्या निर्णयाचा तीव्र शब्दात निषेध करतो आणि आपल्याला अशी विनंती करतो की आपण मनपाच्या निर्णयाला मान्यता देऊ नये व खाजगी कंपन्या, एनजीओ, खाजगी संस्थांच्या ताब्यात मुंबईतील मनपा शाळा देण्याला मनपा सत्ताधाऱ्यांचा डाव हाणून पाडावा. मुंबई शहराच्या विकासात मोलाचे योगदान देणाऱ्या मनपा शाळांचा कारभार महापालिकेकडेच राहिल जेणेकरून मनपा शाळा वाचतील असा निर्णय आपण घ्यावा. ही विनंती.

आपले,

नाव: सही:

*शिक्षणाचे सर्व क्षेत्रातील बाजारीकरण रद्द करण्यासाठी केजी ते पीजी मोफत,समान, गुणवत्तापूर्ण शिक्षण व्यवस्था सार्वजनिक निधीद्वारे प्रत्यक्षात आणण्यासाठी*

# मुंबई शिक्षण कंपनीकरण विरोधी अभियान

अवेहि-अॅबकस प्रकल्प, के.के.मार्ग म्यु. शाळा, न्यू. शिरीन टॉकीजच्या मागे, सात रस्ता, जेकब सर्कल, महालक्ष्मी, मुंबई ४०००११ फोन नं.: २३०७५२३१ email: avehiabacus@gmail.com
युसूफ मेहेरअली सेंटर, डी-१५, गणेश प्रसाद, नउशिर भरूचा मार्ग, ग्रँटरोड (प.),मुंबई - ४००००७ फोन नं. : २३८७००९७ email: yusufmeherally@gmail.com

**महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्याना मुंबईच्या जनतेचे आवाहन**

**मुंबई महानगरपालिकेला मुंबईच्या शाळा खाजगी कंपन्या, एनजीओ, खाजगी संस्थांच्या ताब्यात देण्याचा अधिकार नाही !**

**सर्वांना समान शिक्षण, तरच लोकशाहीचं रक्षण !**

नाव: सही: